Publication: M.Times
Date: 4/5/2019
Page: 2
Column: 2-5

महाराष्ट्र टाइम्स ।
मुंबई । शनिवार, ४ मे २०१९

# ...आणि झामजड पाडा उजळला

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबईपासून अवघ्या २० किलो मीटर अंतरावर वसलेला झामजड पाडा. हा पाडा गेल्या अनेक वर्षांपासून विजेच्या प्रतीक्षेत होता. इथल्या नागरिकांची विजेची प्रतीक्षा शुक्रवारी अखेर संपली. गावात वीजपुरवठा सुरू झाला आणि स्थानिकांनी एकच जल्लोष केला. या विजेच्या दिव्यांनी जणू पाड्यामधल्या प्रत्येकाचा चेहराच उजळला.

## स्थानिकांनी केला जल्लोष

अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीकडून या पाड्यात गेला आठवडाभर वीजवाहिन्या टाकण्याचे काम सुरू होते. शुक्रवारी हे काम संपले आणि गाव प्रकाशाने उजळून निघाले. गावात विजेचा दिवा पेटताच, स्थानिकांनी नाचत गात एकच जल्लोष केला. झामजड पाडा हा मुंबईपासून २० किलो मीटर अंतरावर आहे. शहराच्या एवढ्या जवळ असूनही हा पाडा अद्याप विजेपासून वंचित होता. त्यामुळे एकूणच दैनंदिन व्यवहारावर निर्बंध आले होते. विजेअभावी वैद्यकीय सेवांवरही मर्यादा आली होती. शिवाय स्थानिकांना रात्री घराबाहेर पडणेही अवघड झाले होते. पाड्यात वीजपुरवठा सुरू झाल्याने एका अर्थाने त्यांच्या आयुष्यात नवी पहाटच झाली आहे.

हा पाडा जिल्हाधिकाऱ्यांच्या जमिनीवर वसलेला आहे. इथे वीजवाहिन्या टाकण्यासाठी परवानगी मिळत नव्हती. त्यामुळे गेल्या तीन पिढ्या अंधारात होत्या. चार-पाच वर्षांपूर्वी शेजारील पाड्यावरून वीज खेचून आणली. मात्र पाड्याकडे स्वतःची वीज नसल्याने स्थानिकांना अत्यंत मंद उजेडात वावरावे लागत होते. या पाड्यामध्ये एकूण ५२ घरे आहेत. विद्यार्थी या मंद प्रकाशातच अभ्यास करायचे. मात्र शुक्रवारी संध्याकाळी घरोघरी वीजेचे दिवे उजळल्यावर प्रत्येकाने नाचून आनंद व्यक्त केला.



### हक्काची वीज मिळाली

या पाड्यावरील ईश्वर नम यांनी सांगितले की, इतक्या वर्षांपासून आम्ही विज्येच्या प्रतीक्षेत होतो. आज अखेर आम्हाला आमची हक्काची वीज मिळाली; याचा खूप आनंद झाला आहे. तर चंदू परेड यांनी सांगितले की, आता या उजेडात विद्यार्थी अधिक उत्साहाने अभ्यास करतील. आधीचा उजेड हा खऱ्या अर्थाने उजेड वाटत नव्हता. ती सोय होती. आता मात्र पाडा प्रकाशमान झाला आहे.